**प्रकल्प प्रवर्तक मे. सिलिकॉन इंटरनॅशनल प्रॉडक्ट्स, सर्व्हे क्रमांक ३४/१/२/३/४ब-२, ३५/१-२, ३५/२, ३४/५/अ-२ आणि ब—२, ३६/२-ब-२, खोपोली-पेण रस्ता, पाली फाटा, गाव-दहिवली, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड (४१० २०३), महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित सिलिकॉन फ्लुइड उत्पादन क्षमता १५०.० मेट्रिक टन/महिना पासून ७५०.० मेट्रिक टन/महिना पर्यत विस्तारिकरण करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत-**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. सिलिकॉन इंटरनॅशनल प्रॉडक्ट्स, सर्व्हे क्रमांक ३४/१/२/३/४ब-२, ३५/१-२, ३५/२ येथे स्थित ३४/५/अ-२ आणि ब—२, ३६/२-ब-२, खोपोली-पेण रस्ता, पाली फाटा, गाव-दहिवली, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड (४१० २०३), महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित सिलिकॉन फ्लुइड उत्पादन क्षमता १५०.० मेट्रिक टन/महिना पासून ७५०.० मेट्रिक टन/महिना पर्यत विस्तारिकरण करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार दिनांक ,२५ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजता ऋषिवन रिसॉर्ट, झा अँड असोशिएटस्, सर्व्हे नंबर ८/१, खोपोली पेण रस्ता, आदोशी, शिळफाटा-खोपोली, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड (४१०२०३) येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री प्रशांत भोसले उप प्रादेशिक अधिकार ,रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ , रायगड भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४ तथा आयोजकपर्यावरणविषयक , जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संदेश शिर्के अपर ,जिल्हादंडाधिकारी ,रायगड, अलिबाग तथा अध्यक्ष ,पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती ,श्री संजय भोसले, प्रादेशिक अधिकारी , महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारीपर्यावरणविषयक कार्यरत ,पत्रकार , चॅनलचे प्रतिनिधी व ,सेवाभावी संस्था मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे

स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली .

आयोजक ,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

आयोजक पर्यावरणविषयक ,जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. सिलिकॉन इंटरनॅशनल प्रॉडक्ट्स, सर्व्हे क्रमांक ३४/१/२/३/४ब-२, ३५/१-२, ३५/२, ३४/५/अ-२ आणि ब—२, ३६/२-ब-२, खोपोली-पेण रस्ता, पाली फाटा, गाव-दहिवली, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड (४१० २०३), महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित सिलिकॉन फ्लुड उत्पादन क्षमता १५०.० मेट्रिक टन/महिना पासून ७५०.० मेट्रिक टन/महिना पर्यत विस्तारिकरण करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठीचा प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक ०२-०७-२०२४ रोजीचा अर्ज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक ०४-०७-२०२४ रोजी प्राप्त झाला .

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित अधिसुचनेनुसार संवर्ग ए - ५ (एफ) – सिंथेटिक ऑरगॅनिक केमिकल्स इंडस्ट्री – यात मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण नवी दिल्ली यांची ,भारत सरकार ,वने व हवामान बदल मंत्रालय , "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण नवी, भारत सरकार, वने व हवामान बदल मंत्रालय,दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १३-१२-२०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक २८-१२-२०२३ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी नियुक्त केलेल्या पर्यावरण सल्लागाराद्वारे १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण केले. प्रकल्पाच्या विस्तारामुळे पर्यावरणावरील प्रस्तावित परिणामाचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र दिनांक २५-०७-२०२४ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई यांनी पत्र दिनांक २९-०८-२०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी ,रायगड, अलिबाग यांनी त्यांच्या पत्र दिनांक १३-०९-२०२४ नुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास शुक्रवार, दिनांक २५ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी ०३ .०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या पारित कार्यालयीन आदेश क्रं . ई -१६६ / २०२४,व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी-२४१०२३- एफटीएस-००८२ दिनांक २३-१०-२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा | **-अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी —<br>प्रादेशिक अधिकारी -रायगड,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११,<br>सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४ | - **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ,<br>रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११,<br>सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४ | **-आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ , रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४ यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत व कृषिवल यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक २४-०९-२०२४ रोजी जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित – कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर-४४० ००१

२) जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड,अलिबाग,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड,अलिबाग,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड,अलिबाग,

५) उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय, खालापूर, तालुका- खालापूर, जिल्हा- रायगड,

६) तहसिलदार, तहसिल कार्यालय, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड,

७) गट विकास अधिकारी,पंचायत समिती,तालुका-खालापूर, जिल्हा- रायगड,

८) ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय – मौजे-देवन्हावे, मौजे-दहिवली, मौजे-सावरोली, मौजे-सारसन, मौजे-वडवळ, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड,

९) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

१०) मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

११) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४.

१२) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४.

१३) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी , रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ , रायगड भवन, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई यांना ०२ सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत , करण्याचा नाकारणे किंवा शिफारस आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे ,सूचना नाही अधिकार या समितीसस्थानिकांनी जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना आक्षेप यांची/ इतिवृत्तांत नोंद घेण्यात येईल व त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित ,बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण , आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय नवी दिल्ली यांना ,भारत सरकार ,अध्यक्ष ,पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय ,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली .

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले त्यांनी सांगितले की सदरहू . प्रकल्प हा सिलिकॉन द्रव उत्पादन करत असून बाजारातील मागणीनुसार प्रकल्प व्यवस्थापनाने विस्तारिकरण योजिलेले आहे. प्रकल्पाची एकूण किंमत १०.०० कोटी रुपये असून विस्तारिकरण प्रकल्पाची प्रस्तावित किंमत ही ११.७० कोटी रुपये आहे. विस्तारीकरणानंतर प्रकल्पाची एकूण किंमत ही २१.७० कोटी रुपये असेल.

विस्तारिकरण पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पात अतिरिक्त ५० व्यक्तींची गरज लागणार आहे. त्यासाठी प्रस्तावित प्रकल्पात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येणार आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांचे पालन करण्यात येईल.

कार्यरत आणि विस्तारित प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेसाठी भांडवली खर्च एकूण २५.८५ लाख असून विस्तारानंतर आवर्ती खर्च हा ५.१४ लाख एवढा असेल.

तसेच प्रकल्पाने कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधी (सीईआर) साठी रुपये १०.८० लाख एवढी आर्थिक तरतुद केलेली आहे.

प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून प्रकल्प व्यवस्थापनाने वेळोवेळी प्रकल्प परिसरात सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक बरेच उपक्रम राबविलेले असून आर्थिक मदतही मोठ्या प्रमाणात केलेली आहे. भविष्यातही प्रकल्प परिसरात विविध सामाजिक योजना राबविण्यासाठी सहकार्य करण्यात येईल.

**<u>सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर -</u>**

१) **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी विचारणा केली की-**

विस्तारिकरण प्रकल्पामुळे किती रोजगाराची निर्मिती होईल या स्लाईडबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.

पर्यावरण सल्लागार यांनी स्लाईडव्दारे सांगितले की सद्या कार्यरत प्रकल्पात २० (वीस) व्यक्तींना रोजगार प्रदान करण्यात आलेला असून विस्तारिकरणानंतर प्रकल्पात ५० (पन्नास) व्यक्तींना रोजगाराची संधि मिळू शकते. म्हणजे एकूण ७० (सत्तर) व्यक्तींना प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात येईल.

२) <u>सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी विचारणा केली की:-</u>

विस्तारिकरण प्रकल्पासाठी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) घेताना विस्तारिकरण प्रकल्पाचे बांधकाम करताना भूखंडाचे चटई क्षेत्र तपासण्यात यावे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी त्याबाबत कृती करण्याचे आश्वासन दिले.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणाबाबत काही सूचना, प्रश्न, आक्षेप, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. सदस्य आणि आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले नांव व गावाचे नांव सांगण्याची सूचना केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **<u>श्री अनिकेत दिलीप पवार, राहणार—तांबाठी गाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड:-</u>**

प्रकल्प विस्तारिकरणानंतर स्थानिकांचा काय फायदा होईल?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रकल्प विस्तारिकरणामुळे प्रकल्पात रोजगाराची संधि उपलब्ध होणार आहे. त्यासाठी लागणारे मनुष्यबळ हे मुंबई, पुणे येथून आणणे कंपनीस शक्य नाही. विस्तारिकरण प्रकल्पात येथील स्थानिकांनाच रोजगाराची संधि देण्यात येईल.

२) **<u>श्री राकेश रमेश महामुणकर, राहणार-दहिवली गाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड:-</u>**

या कंपनीच्या बाजूलाच लागून आमची जमिन आहे. गेले २०-२५ वर्षे ही कंपनी कार्यान्वित आहे. कंपनीच्या उत्पादन प्रक्रियेमुळे आतापर्यंत स्थानिकांना काहीही त्रास

झालेले नसून विस्तारिकरणामुळे भविष्यातही आम्हांला काही त्रास होऊ नये अशी आमची इच्छा आहे. प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पास आमचा स्थानिकांचा विरोध नाही. मात्र विस्तारिकरण प्रकल्पात स्थानिकांनाच रोजगाराची संधि देण्यात यावी ही आमची कळकळीची विनंती आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की १००% याचा विचार करण्यात येईल.

**३) श्री सतिश सुरेश पाटील, राहणार-दहिवली गाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड:-**

मी समाजसेवक आहे. आजपर्यंत कंपनीमुळे कुठलाही पर्यावरणीय त्रास झालेला नाही. तसेच कंपनी व्यवस्थापनास एखाद्या स्थानिक व्यक्तीस रोजगार देण्यासाठी संपर्क केल्यास, पद रिक्त असल्यास कंपनी त्वरित सकारात्मक निर्णय घेते. तरी विस्तारिकरण प्रकल्पात स्थानिक व्यक्तींना, युवक-युवतींना त्यांच्या शैक्षणिक अहर्तेनुसार व कंपनीच्या गरजेनुसार रोजगाराची संधि देण्यात यावी. कंपनीकडून परिसरातील शाळांसाठी शैक्षणिक साहित्य वेळोवेळी उपलब्ध करण्यात येते. त्याचप्रमाणे गावासाठी काही सामाजिक उपक्रमाची गरज असल्यास कंपनी व्यवस्थापनास मागणी केल्यास त्याची पूर्तता करण्यात येते. कंपनीकडून स्थानिक गावांसाठी वेळोवेळी सहकार्य मिळालेले आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी आश्वासन दिले की भविष्यातही अशाचप्रकारे सहकार्य कंपनी व्यवस्थापनाकडून स्थानिकांना करण्यात येईल.

**४) श्री दिनेश सुभाष मरागजे, राहणार-वडवळ, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड:-**

प्रकल्प विस्तारिकरणात वृक्षारोपण करताना किती झाडे लावण्यात येतील?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की सद्या कार्यरत प्रकल्पात ३०२ झाडे लावण्यात आलेली आहेत. विस्तारिकरण प्रकल्पात २,७९४ झाडे लावण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

**५) श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, राज्य-तेलंगणा:-**

प्रकल्प विस्तारीकरण योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापनाला माझ्या शुभेच्छा. माझ्या मते, बेरोजगारी हे भारतातील प्रमुख प्रदूषण आहे. पर्यावरणाचा पैलू महत्त्वाचा आहे, त्याचप्रमाणे विकासाचा पैलूही महत्त्वाचा आहे. या संदर्भात, औद्योगिक विकास देखील आवश्यक आहे, कारण भारतातील औद्योगिक क्षेत्र हे ९०% रोजगार संधी

प्रदान करते. त्याचवेळी, प्रकल्प प्रवर्तकांनीसुध्दा पर्यावरणीय संतुलन राखण्याची जबाबदारी आणि काळजी घेणे आवश्यक आहे.

यासाठी, तुम्ही जे काही वृक्षारोपण/हरितपट्टा विकास नियोजित केलेले आहे, त्यासाठी मी सूचना देऊ इच्छितो की कृपया सामान्य/इतर झाडे लावण्याऐवजी फळ देणारी झाडे आणि औषधी मूल्यवान वनस्पतींची लागवड करण्यास प्राधान्य देण्यात यावे. नवीन पिढ्यांना त्याचा खूप उपयोग होईल. तसेच पावसाचे पाणी साठवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. प्रकल्पात पाणी साठवण यंत्रणा कार्यान्वित करावी. त्यामुळे भूगर्भातील पाण्याचे प्रमाण वाढण्यास मदत होईल.

शासनाच्या मदतीने, कृपया स्थानिक तरुण मुला-मुलींना विविध नोकऱ्यांसाठी सक्षम करण्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण योजना राबविण्यात यावी. कंपनी व्यवस्थापनाने ७० व्यक्तींना नोकऱ्या उपलब्ध करून देण्याची योजना आखली आहे, जी अत्यंत कौतुकास्पद आहे कारण तुम्ही अतिरिक्त ११.७० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची योजना आखली आहे.

ग्रामस्थ, कंपनीचे अधिकारी, राज्य प्रदूषण नियंत्रण अधिकारी आणि स्थानिक प्रतिनिधी यांची CSR उपक्रम, CSR बजेट खर्च करण्यासाठी एक समन्वय समिती स्थापन करण्याची मी सूचना करत आहे. फक्त जनतेस आवश्यक असणारेच उपक्रम हाती घेण्यात यावे. त्याची अंमलबजावणी झाल्यास कंपनी व्यवस्थापनाला मोठी विश्वासार्हता प्राप्त होईल.

शेवटी मी पर्यावरण सल्लागाराचे अभिनंदन करतो की ज्यांनी तपशीलवार अहवाल तयार केलेला आहे. शक्य असल्यास, कृपया प्रकल्प क्षेत्रातील लोकांची सध्याची आरोग्य स्थिती, क्षेत्रातील पीकांची सद्यस्थिती आणि सध्याची भूजल उपलब्धता याबद्दल माहिती गोळा करण्यात यावी.

शेवटी मी या उद्योगाला बिनशर्त परवानगी देण्यासाठी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना शिफारस करण्याची पॅनेल समितीला विनंती करत आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उपस्थित केलेल्या सूचनांचा विचार करण्याचे आश्वासन दिले.

**६) श्री सनी दशरथ यादव, राहणार-देवन्हावे, तालुका-खालापूर, जिल्हा -रायगड:-**

आजपर्यंत कंपनीने स्थानिकांना चांगल्याप्रकारे सहकार्य केलेले आहे. प्रकल्प व्यवस्थापनाने विस्तारीकरणाचे नियोजन केलेले आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या उत्पन्नातही

वाढ होणार आहे. तरी कंपनी प्रशासनास विनंती आहे की असेच सहकार्य भविष्यातही कंपनीने वेळोवेळी करावे. कंपनीस स्थानिकांचा पाठिंबा आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी भविष्यात सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडूना कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले आणि जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले,

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(प्रशांत भोसले)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
रायगड-१,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नवी मुंबई

**(संजय भोसले)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी-रायगड
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नवी मुंबई

**(संदेश शिर्के)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा - रायगड